Jagdamba Education Society's

# Santosh N. Darade Polytechnic

At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

Accredited by NATIONAL BOARD OF ACCREDITATION

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 24/06/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

आपल्या बातम्या, आतल्या बातम्या...
आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

# दिनविशेष

## प्रसिद्ध नाट्य अभिनेते नानासाहेब फाटक



गोपाळ गोविंद फाटक ऊर्फ नानासाहेब फाटक हे मराठीतले एक नटश्रेष्ठ म्हणून गणले गेलेले नाट्य-अभिनेते होते. त्यांचा जन्म २४ जून १८९१ रोजी झाला. मराठी रंगभूमीवर फार थोड्या नटांना खलनायकांच्या भूमिका करून यश, कीर्ती आणि संपत्ती यांचा लाभ झाला. अशा थोड्या नटांत नानासाहेबांची गणना प्रामुख्याने होते. धीरगंभीर आवाज आणि प्रभावी संवादफेकीने त्यांनी नाट्यसृष्टीवर अभिनयाचा अविस्मरणीय ठसा उमटवला आहे. विद्यार्थीदशेतली नानासाहेबांची काकासाहेब खाडिलकरांच्या 'सत्त्वपरीक्षा' या नाटकातली विश्वामित्राची भूमिका खूप गाजली, पण त्यांना खरी प्रसिद्धी आणि लोकप्रियता लाभली ती 'रक्षाबंधन' या नाटकातील 'गिरीधर'च्या भूमिकेने. या भूमिकेने त्यांचे नाव सर्वतोमुखी झाले. हा सुशिक्षित आणि देखणा नट आपल्याकडे असावा असे गुणग्राहक केशवराव भोसल्यांना वाटले आणि त्यांनी नानासाहेबांना ललितकलेत बोलावले.

'राक्षसी महत्त्वाकांक्षा' या नाटकातील वीरश्रीयुक्त विक्रांत, 'संन्याशाचा संसार'मधील शंकराचार्य, 'सत्तेचे गुलाम'मधील केरोपंत वकील, 'शहाशिवाजी' नाटकात शहाजी, 'कृष्णार्जुन युद्धात' चित्ररथ गंधर्व, 'हाच मुलाचा बाप'मध्ये वसंत, 'श्री' या नाटकातील कुसुमाकर, 'सोन्याचा कळस' नाटकातील कामगार बाबा शिगवण इ. भूमिका तर खूपच गाजल्या, पण 'पुण्यप्रभाव'मधील वृंदावन, 'एकच प्याला'मधील सुधाकर, 'झुंजारराव' नाटकातील झुंजारराव आणि 'हॅम्लेट' या भूमिका त्यांच्या सर्वोच्च भूमिका होत. नाट्यवाङ्मयावर भाष्य करणारा विचारवंत म्हणूनही त्यांचे लेखन गाजले. 'मुखवट्याचे जग' हे पुस्तक त्याची साक्ष आहे. देशभरातल्या 'सर्वोत्कृष्ट नटा'चा सन्मानही त्यांना मिळाला. केंद्र सरकारने सर्वश्रेष्ठ नट म्हणून नानासाहेबांना गौरवचिन्ह अर्पण केले होते. त्यांच्याइतका भव्य, रुबाबदार, देखणा आणि ग्रेसफुल नट आजतागायत दुसरा कुणी झाला नाही. अशा या मराठी रंगभूमीवरील नटसम्राटाचे ८ एप्रिल १९७४ रोजी निधन झाले.

Nashik Edition
Jun 24, 2025 Page No. 2
Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

सकाळ

# शिक्षण घेतानाच २२८ विद्यार्थ्यांना नोकरी

## बाभूळगावच्या एसएनडी पॉलिटेक्निकमध्ये प्लेसमेंटमधून नामांकित कंपन्यांमध्ये निवड

**सकाळ वृत्तसेवा**

येवला, ता. ९ : शिक्षण घेताना शेवटच्या वर्षातच नोकरी लागली तर होणारा आनंद गगनापार असतो. बाभूळगाव येथील जगदंबा एज्युकेशन संस्थेच्या एसएनडी पॉलिटेक्निकमध्ये वर्षभरात तब्बल २२८ विद्यार्थ्यांना शिकत असतानाच नोकरीची संधी मिळाली आहे.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये एसएनडी पॉलिटेक्निक येथे आयोजित पूल कॅम्पसमध्ये या विद्यार्थ्यांची विवीध नामांकित कंपन्यांमध्ये निवड झाली आहे. संस्थेने आणखी एक यशाचे शिखर गाठले आहे. विद्यार्थांना औद्योगिक क्षेत्राची माहिती व्हावी यासाठी तज्ज्ञांचे व्याख्यान व विविध कंपन्यांना भेटी देऊन तेथे होत असलेल्या कामाची रूपरेषा कशी असते याविषयी मार्गदर्शन आयोजित केले जाते. पुणे येथील टाटा मोटर्स मध्ये ५० विद्यार्थ्यांची निवड झाली. नाशिक येथील बॉश कंपनीमध्ये मेकॅनिकल अभियांत्रिकीचे १७ विद्यार्थी तर इलेक्ट्रिकल अभियांत्रिकीचे १८, मुंबई येथील भारत गिअर कंपनीमध्ये मेकॅनिकलच्या ३५ विद्यार्थांची, अहिल्यानगर येथील माय इंडिया कंपनीत मेकॅनिकलचे १८ विद्यार्थी तर इलेक्ट्रिकलचे २२ विद्यार्थ्यांची निवड झाली. संभाजीनगर येथील बजाज ऑटो कंपनीमध्ये मेकॅनिकलच्या २८ विद्यार्थी तर इलेक्ट्रिकलच्या २५ विध्यार्थांची निवड झाली. नाशिक येथील स्कायवे ग्रुपमध्ये सिव्हील इंजिनिअरिंगच्या १५ विद्यार्थ्यांची निवड झाली. विविध कंपन्यांमध्ये निवड झालेल्या विध्यार्थांना प्रतिवर्ष सरासरी ३-४ लाख रुपये पगार व कंपनीच्या विविध सुविधा मिळणार असल्याची माहिती प्राचार्य उत्तम जाधव यांनी दिली. संस्थेचे कार्यकारी संचालक रुपेश दराडे, प्राचार्य जाधव यांच्यासह विभागप्रमुख संदीप असुदे, गणेश चव्हाण, शोराब शेख, रविकुमार ताकसांडे, विजय गंडोळे, प्रवीण लहरे, संतोष माकुने आदींनी विध्यार्थांचे अभिनंदन केले.



**बाभूळगाव :** कॅम्पस प्लेसमेंटमधून नोकरीसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांसोबत महाविद्यालयाचे प्राध्यापक.

> एसएनडी कॅम्पसमध्ये उपलब्ध अत्याधुनिक सुविधेमुळे तसेच विद्यार्थ्यांना शिकत असतानाच कॅम्पस मुलाखती व कंपन्यांसंदर्भात ज्ञान व माहिती देण्याचा प्रयत्न होतो. त्याचे फलित म्हणजे अधिकाधिक विद्यार्थ्यांना शिकत असतानाच नोकरी मिळत आहे याचा संस्थेला अभिमान वाटतो.
>
> **- रूपेश दराडे,** संचालक, मातोश्री शिक्षण संस्था, येवला.

Nashik, District-Today
10/06/2025 Page No. 3